पोलीस उप आयुक्त (मुख्यालय),
मिरा-भाईदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय
कार्यालयाचा पत्ता-सेक्टर ५, रामनगर, शांतीगार्डन, मिरा-रोड (पुर्व),
ठाणे.४०११०७ फोन नंबर-०२२-२९४५११००
E-mail:-dcphq.mb-vv@mahapolice.gov.in

जा.क्र.- पोउपआ(मुख्या)/रमजान सण/अधिसुचना/ ९५० /२०२५ दि.१९/०२/२०२५

**रमजान सणामध्ये मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या अधिकार क्षेत्रातील अति रहदारीच्या ठिकाणी वाहतुक कोंडी होवु नये म्हणुन वाहतुक नियंत्रण अधिसुचना**

---

ज्याअर्थी नयानगर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी यांनी त्यांचेकडील गो. जा. क्र. १७८/२०२५, दि.-१५/०२/२०२५ अन्वये काशिमीरा वाहतुक विभाग, परिमंडळ -०१ चे प्रभारी अधिकारी यांचे मार्फतीने आमचे असे निदर्शनात आणुन दिले आहे कि, मिरा-भाईंदर शहरातील नयानगर पोलीस ठाणे हद्दीमध्ये येत असलेल्या निहाल कॉर्नर, नरेंद्र पार्क, लोढा रोड, निलम पार्क, एन.एच.स्कुल सर्कल, गितानगर फेज-III, हैदरी चौक या ठिकाणी दि. २८/०२/२०२५ ते दि. ३१/०३/२०२५ रोजी पर्यंत दुपारी १६.०० वाजता ते रात्रौ २४.०० वाजे पर्यंत रमजान सणामुळे खरेदीसाठी व विक्रीसाठी येणा-या मुस्लिम बांधवांची तसेच इतर नागरीकांची मोठया प्रमाणात वर्दळ असते. यामुळे सदर परिसरांतील संपुर्ण रस्ते नागरीकांच्या वर्दळीने भरल्यामुळे वाहनांना येण्या-जाण्यास मोठया प्रमाणात अडथळा निर्माण होत असतो. अशातच वाहनांमुळे पादचा-यांचा किरकोळ अगर गंभीर अपघात झाल्यास कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता आहे. यामुळे सदर परीसरातील रस्त्यांवर पादचा-यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने व वाहतुक कोंडी टाळण्याच्या दृष्टीने १) एन.एच.हायस्कुल सर्कल नाका २) निहाल कॉर्नर नाका ३) निलम पार्क नाका ४) हैदरी चौक येथे रस्त्यांवर बॅरीकेटींग करुन अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळता, दुचाकी वाहने वगळता इतर सर्व वाहनांना प्रवेशास प्रतिबंध करणे आवश्यक आहे, अशी मागणी नयानगर पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांनी केली आहे.

त्याअर्थी, मी सुहास बावचे, पोलीस उप-आयुक्त, मुख्यालय, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या वाहतुक विभागाचे पोलीस उप आयुक्त म्हणुन शहरातील रस्त्यांवर वाहतुक कोंडी होवु नये व अपघात होवु नये यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३३ (१) (ब) प्रमाणे व मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन पुढील प्रमाणे अधिसुचना जारी आहे.

रमजान सणामुळे मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या नयानगर पोलीस ठाणे हद्दीमधील निहाल कॉर्नर, नरेंद्र पार्क, लोढा रोड, निलम पार्क, एन.एच.स्कुल सर्कल, गितानगर फेज - III, हैदरी चौक या परीसरात खरेदी- विक्रीसाठी येणारे मुस्लिम बांधव व इतर नागरीकांच्या वाढलेल्या वर्दळीमुळे होणारे संभाव्य अपघात व वाहतुक कोंडी टाळण्यासाठी खालील प्रमाणे वाहतुक नियोजन करण्यात येत आहे.

**दि.२८/०२/२०२५ ते दि. ३१/०३/२०२५ रोजी पर्यंत** दररोज दुपारी १६.०० वाजता ते रात्रौ २४.०० वाजे पर्यंत नयानगर पोलीस ठाणे हद्दीतील खालील ०४ ठिकाणी दुचाकी व अत्यावश्यक सेवेतील वाहने (पोलीसांची वाहने,फायर ब्रिगेड, ॲम्ब्युलन्स इ.) वगळता तसेच वरील परीसरात राहणा-या रहीवाशांची वाहने वगळता **इतर वाहनांना प्रवेश करण्यास मज्जाव करण्यात येत आहे.**

१. प्रवेश बंद - एन.एच.स्कुल रोड चौक ते हैदरी चौकाच्या दिशेने जाताना

**पर्यायी मार्ग** - शिवार गार्डन सिग्नल मार्गे इच्छित स्थळी जाण्यास मुभा आहे.

२. प्रवेश बंद - हैदरी चौक ते नरेंद्र पार्कच्या दिशेने जाताना

**पर्यायी मार्ग**-नयानगर पो. ठाणे मार्गे व एच.पी.पेट्रोल पंप मार्गे इच्छित स्थळी जाण्यास मुभा आहे.

३. प्रवेश बंद -निहाल कॉर्नर/शम्स मस्जिद चौक ते नरेंद्र पार्क/लोढा दिशेने जाताना

**पर्यायी मार्ग**- पुजानगर रोड (मिरा दातार रोड)मार्गे, अस्मिता क्लब रोडमार्गे इच्छित स्थळी जाण्यास मुभा आहे.

४. प्रवेश बंद - निलम पार्क चौक ते लोढा रोड/नरेंद्र पार्कच्या दिशेने जाताना

**पर्यायी मार्ग** - बॅंक रोडने वाहनांना इच्छित स्थळी जाण्यास मुभा आहे.

**प्रवेश बंद करण्यात आलेल्या ठिकाणावर वाहने पार्किंग न करता नमुद परीसरात प्रवेश करु इच्छिणा-या नागरीकांसाठी खालील प्रमाणे पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे.**

१. एन.एच.स्कुल रोड चौक ते हैदरी चौकाच्या दिशेने जाणा-या वाहनांसाठी
**पार्किंग** - एन.एच.स्कुलचे ग्राऊंड मध्ये

२. हैदरी चौक ते नरेंद्र पार्कच्या दिशेने जाणा-या वाहनांसाठी -
**पार्कींग** - कम्युनिटी एमबीएमसी हॉल समोर

३. निहाल कॉर्नर/शम्स मस्जिद चौक ते नरेंद्र पार्क/लोढा दिशेने जाणा-या वाहनांसाठी -
**पार्किंग** - शम्स हॉल समोरील बंद रस्त्यावर

४. निलम पार्क चौक ते लोढा रोड/नरेंद्र पार्कच्या दिशेने जाणा-या वाहनांसाठी
**पार्कींग**- निलम पार्क ते मेडतिया मैदान रोडकडे जाणा-या रोडवर

सदरची वाहतुक नियंत्रण अधिसुचना मी सुहास बावचे, पोलीस उप-आयुक्त, मुख्यालय, मिरा-भाईंदर, वसई-विरार आज दि.१९/०२/२०२५ रोजी माझ्या सही शिक्यानिशी जाहीर करत आहे.

पोलीस उप आयुक्त (मुख्या.) मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय

१९/०२/२५

( सुहास बावचे )
पोलीस उप-आयुक्त, मुख्यालय
मिरा-भाईंदर, वसई-विरार

**आवश्यक कार्यवाहीकरीता प्रत-**

१. सहायक पोलीस आयुक्त, वाहतूक व मिरारोड, भाईंदर, मिरा-भाईंदर, वसई-विरार
२. प्रभारी अधि. काशिमीरा वाहतूक विभाग, प्रभारी अधि.- नयानगर पोलीस ठाणे योग्य बंदोबस्त नेमण्यासाठी.
३. प्रबंधक, शासकिय मुद्रणालय,मुंबई (शासनाच्या राजपत्रात प्रसिध्दी करण्यासाठी)
४. जनसंपर्क अधिकारी, मि.भा.व.वि, पोलीस आयुक्तालय (अधिसूचना प्रसिद्धीसाठी)
५. व्यवस्थापक - बेस्ट, एमबीएमटी, टीएमटी, एनएनएमटी, ठाणे राज्य परिवहन बस सेवा
६. सर्व रिक्षा युनीयन अध्यक्ष – मिरा-भाईंदर शहर
७. अध्यक्ष - टेम्पो चालक/ मालक संघटना, मिरा-भाईंदर

**प्रत सस्नेह अग्रेषित –**

पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-१, मिरा-भाईंदर वसई-विरार

**प्रत माहितीस्तव सविनय सादर –**

१. मा. पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार
२. मा. अपर पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार
३. मा. जिल्हाधिकारी, ठाणे
४. मा. आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका